


Subscribe इयत्ता – चौथी (12 जुलै) माझा अभ्यास Subscribe

# शासनाच्या 45 दिवसाच्या ब्रीज कोर्ससोबत माझा अभ्यास PDF

**शासनाच्या ब्रीज कोर्ससोबत क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा अभ्यासक्रम समाविष्ट**

## दिवस बारा :







गतवर्षीच्या क्षमता प्राप्त विद्यार्थ्यांसाठी चालू इयत्तेचा नियमित अभ्यासक्रम समाविष्ट.

खालील चित्रात एकमेकांशी काय संवाद साधत असतील ते वर्णन कर.


## आम्ही संवाद करतो

### २. बोलणारी नदी

टेस्ट सोडवा












- वरील चित्रांतील पक्षी व प्राणी आपल्या पिलांशी काय बोलत असतील याची कल्पना करून त्यांच्यातील संवाद लिहा.


## २. संख्याज्ञान


टेस्ट सोडवा


### खालील संख्या अंकात लिहा.


◆ प्रतीके पाहा. संख्या लिहा व वाचा.


(१)



(२)



(३)



(४)



(५)



(६)



### अक्षरी संख्येचे अंकांत लेखन

(१) चार हजार अठ्ठावीस : ४०२८

हजाराच्या घरात ४ लिहिले. मग शतक, दशक व एककाच्या घरातही अंक लिहिले पाहिजेत. दिलेल्या संख्येत शतक नाहीत, म्हणून त्या घरात शून्य लिहिला. अठ्ठावीसमध्ये २ दशक व ८ एकक आहेत, म्हणून दशकाच्या घरात २ व एककाच्या घरात ८ लिहिले.

(२) पाच हजार तीनशे नऊ : ५३०९

या संख्येत हजाराच्या घरात ५, शतकाच्या घरात ३ आहेत. दशक नाहीत म्हणून दशकाच्या घरात ० लिहिले. एककाच्या घरात ९ लिहिले.

> चार अंकी संख्या लिहिताना प्रथम हजाराच्या स्थानातील अंक लिहून नंतर क्रमाने शतक, दशक व एककाच्या स्थानात ० ते ९ पैकी योग्य अंक लिहावा.

### स्वाध्याय

१. दिलेल्या संख्या अंकांत लिहा.


| संख्या (अक्षरांत) | ह | श | द | ए |
|---|---|---|---|---|
| (१) चार हजार पाच | | | | |
| (२) पाच हजार सतरा | | | | |
| (३) सात हजार तीनशे तेरा | | | | |
| (४) आठ हजार | | | | |
| (५) नऊ हजार नऊशे नव्याण्णव | | | | |

Write the following numbers in numbers. **2. Number Work**


टेस्ट सोडवा

◆ **Look at the symbols. Write the number and read it.**


(1)





(2)





(3)





(4)




(5)




(6)




## Numbers in words and figures

**1. Four thousand and twenty-eight : 4028**

Write 4 in the thousands place. Now, we must write the digits in the hundreds, tens and units places, too. The given number has no hundreds. So, we write a zero in the hundreds place. Twenty-eight has 2 tens and 8 units. So we write 2 in the tens place and 8 in the units place.

**2. Five thousand three hundred and nine : 5309**

In this number, there is 5 in the thousands place and 3 in the hundreds place. There are no tens, so we write 0 in the tens place. We write 9 in the units place.

**When writing a four-digit number in figures, we first write the digit in the thousands place. Then, we write the proper digit from 0 to 9 in the hundreds, tens and units places in that order.**

**Exercise**

1. Write the given numbers in figures.

| Number in words | Th | H | T | U |
|---|---|---|---|---|
| (1) Four thousand and five | | | | |
| (2) Five thousand and seventeen | | | | |
| (3) Seven thousand three hundred and thirteen | | | | |
| (4) Eight thousand | | | | |
| (5) Nine thousand nine hundred and ninety-nine | | | | |

टेस्ट सोडवा

# Listen carefully and read.

## One at a Time

**1. Listen carefully and read with me.**
लक्ष देऊन ऐका आणि माझ्याबरोबर वाचा.

Priya liked sweets.
Her Granny had a jar
full of sweets.
She gave Priya
one sweet at a time.
But Priya wanted more.
Many, many more.





She quickly put her hand in the jar of sweets.
She took one, two, five, ten, many.
But her hand was stuck in the jar.
She could not take it out.
She began to cry.
"Oh, what shall I do ?"
"Let go of the sweets,"
said her Granny.





Priya let go of some sweets.
Still, her hand would not come out.
She let go of some more sweets.
Now there was only one in her hand.
Her hand came out of the jar easily.

She began to smile,
and looked at her Granny.
Granny smiled too. Priya said,
"Now I will take only one at a time !"



उतारा वाचा व समजून घ्या.

## २. सजीवांचे परस्परांशी नाते

या प्राण्यांकडूनही माणसाला अनेक गोष्टी मिळतात. दूधदुभते, मांस, अंडी असे अन्नपदार्थ त्याला मिळतात. काही प्राणी त्याला ओझी वाहण्यासाठी आणि गाड्या ओढण्यासाठी उपयोगी पडतात. शेतीसाठी कष्टाची कामे करण्यासाठीही तो पाळीव प्राण्यांची मदत घेतो. कुत्रा घराची राखण करतो. मेंढ्यांपासून माणसाला लोकर मिळते. पाळलेले प्राणीही माणसांना जीव लावतात.

टेस्ट सोडवा

### माहीत आहे का तुम्हांला

- पाळीव प्राण्यांची विष्ठादेखील माणसाच्या उपयोगी पडते.
- गाईम्हशींच्या शेणापासून गोवऱ्या थापतात. गोवऱ्या ज्वलनशील पदार्थ आहे. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी गोवऱ्या इंधन म्हणून वापरतात.
- जनावरांच्या विष्ठेपासून गोबरगॅस नावाचा ज्वलनशील वायू तयार करतात. तोही इंधन म्हणून वापरतात.
- गाईम्हशींच्या शेणापासून शेणखत, तर शेळ्या आणि मेंढ्या यांच्या लेंड्यांपासून लेंडीखत मिळते. शेतकरी ते शेतीसाठी वापरतात.







प्राणी आमचे दोस्त



# २. संतांची कामगिरी

**वाचा व समजून घ्या.** **सराव करा.** टेस्ट सोडवा

देहू गावचे राहणारे. त्यांच्या घरी शेतीभाती होती. त्यांचे किराणा मालाचे दुकानही होते. त्यांचे वाडवडील अडल्यानडल्यांना कर्ज देत; पण तुकारामांनी आपल्या वाटणीची कर्जखते इंद्रायणी नदीमध्ये बुडवली आणि अनेकांना कर्जमुक्त केले. जवळच्या डोंगरावर जाऊन ते विठ्ठलाचे भजन करत. आषाढी-कार्तिकीला पंढरीला जात. कीर्तन करत, अभंग रचत आणि ते अभंग लोकांना म्हणून दाखवत. हजारो लोक त्यांच्या कीर्तनाला येत. शिवरायसुद्धा त्यांच्या कीर्तनाला जात असत. संत तुकाराम लोकांना दया, क्षमा, शांती यांची शिकवण देत, समतेचा उपदेश करत –

'जे का रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले
तोचि साधु ओळखावा । देव तेथेचि जाणावा ।'

हा संदेश त्यांनी लोकांच्या मनावर बिंबवला. लोकांच्या मनात विचार जागे केले. लोक संत तुकारामांचा जयजयकार करू लागले. आजही महाराष्ट्रभर आपल्याला 'ग्यानबा-तुकाराम' हा जयघोष ऐकू येतो. ज्ञानेश्वरांनाच 'ग्यानबा' असे म्हणतात. 'तुकारामगाथा' आजही घरोघरी वाचली जाते.

**समर्थ रामदास :** त्याच काळात महाराष्ट्राच्या कडेकपारीत 'जय जय रघुवीर समर्थ' अशी रामदासांची गर्जना घुमत होती. त्यांचा जन्म मराठवाड्यात गोदावरीच्या काठी जांब या गावी रामनवमीच्या दिवशी झाला. रामदासांचे



समर्थ रामदास

मूळ नाव नारायण, पण ते स्वत:ला 'रामाचा दास' म्हणू लागले. 'दासबोध' या त्यांच्या ग्रंथातून त्यांनी लोकांना मोलाचा उपदेश केला. तसेच त्यांच्या मनाच्या श्लोकांतून त्यांनी लोकांना सद्विचार व सद्वर्तन यांची शिकवण दिली. बलोपासनेसाठी त्यांनी ठिकठिकाणी हनुमानाची मंदिरे उभारली. लोकांना शक्तीची उपासना करण्यास शिकवले. 'सामर्थ्य आहे चळवळीचे, जो जो करील तयाचे', हा संदेश त्यांनी लोकांना दिला. रामदासांनी लोकांना संघटना करण्याची व अन्यायाविरुद्ध प्रतिकार करण्याची स्फूर्ती दिली. त्यामुळे त्या काळच्या लोकांना धीर आला.

साधुसंतांच्या कार्यामुळे लोकजागृती झाली. धर्माबद्दल आदर वाढला. लोकांच्या मनांत आत्मविश्वास निर्माण झाला. संतांच्या कामगिरीचा शिवरायांनी स्वराज्यस्थापनेसाठी उपयोग करून घेतला.

## स्वाध्याय

१. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

(अ) संत नामदेव ............ निस्सीम भक्त होते.

(आ) ज्ञानेश्वरांनी तरुण वयात पुण्याजवळ ........... येथे जिवंत समाधी घेतली.

## स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन

| चौथी मराठी | चौथी गणित | सेमी गणित | चौथी इंग्रजी | चौथी प.अ-1 | चौथी प.अ-2 |
|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरुन...

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा | क्लिक करा |

## MiniShala शैक्षणिक ॲप्स खालील लिंकवरुन डाऊनलोड करा.

| पहिली | दुसरी | तिसरी | चौथी | पाचवी | सहावी | सातवी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | आठवी | नववी | दहावी | | |

## गुरुमाऊली शैक्षणिक ॲप्स – Click Here